# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने ग्रामिण भागातील विकासाकरिता आणखी ४० लाख रूपयांचा निधी मंजूर

पनवेल (प्रतिनिधी) सन २०१४-१५ या वित्तीय आर्थिक वर्षासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान उपलब्ध झाला असून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल विधानसभा मतदार संघातील गावांच्या विकासकामांसाठी आणखी ४० लाख रूपयांचा निधी ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून मंजूर झाला आहे.

गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामविकास राज्यमंत्री सतेज पाटील यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार ग्रामीण भागातील रस्ते, स्मशानभुमी व अन्य मुलभूत सुविधा कामांना राज्य शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून मंजूर मिळाली असून ग्रामविकास राज्यमंत्री सतेज पाटील यांच्या सहकार्याने व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल विधानसभा मतदार संघातील वांगणी तर्फे वाजे विभागातील मोहोचापाडा येथे पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ०८ लाख रूपये, लोणिवली येथे अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरणासाठी ०६ लाख रूपये, ओवे ग्रामपंचायत हद्दीतील ओवेकॅम्प येथे अंतर्ग त रस्ते कॉक्रीटीकरणासाठी ०८ लाख रूपये, कसळखंड ग्रामपंचायत हद्दीतील अरिवली येथे रस्ता कॉक्रिटीकरणासाठी ०४ लाख रूपये, शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील आंबे तर्फे तळोजे येथे स्मशानभुमीकरिता ०७ लाख रूपये आणि मालडुंगे बौध्दवाडी येथे स्मशानभुमी बांधण्यासाठी ०७ लाख रूपये असा एकूण ४० लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे.